RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ९(४)] सोमवार, जानेवारी १९, २०२६/ पौष २९, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ जानेवारी, २०२६.

**अधिसूचना**

**नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ मध्ये नाशिक महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील अग्निशामक (फायरमन) या पदाची शैक्षणिक अर्हता सुधारणा.**

क्रमांक नामपा-२०२१/प्र.क्र.२२५/नवि-२५.—नाशिक महानगरपालिकेमध्ये अंमलात असलेले क्रमांक.-नामपा-२०१७/प्र.क्र.२३३ (भाग-१)/नवि-२५, दिनांक २८ सप्टेंबर २०२२ रोजी निर्गमित केलेले नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ यामध्ये, पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**नियम**

१. **संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती :—**

१. या नियमांना " नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ मध्ये नाशिक महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील अग्निशामक (फायरमन) या पदाची शैक्षणिक अर्हता सुधारणा." असे संबोधण्यात येईल.

२. हे नियम अंतिमरित्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

३. या नियमान्वये, नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०२२ च्या परिशिष्ट (२) मधील अनुक्रमांक ०८ समोरील पदांच्या **"नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती " यामध्ये खालील तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार सुधारणा करण्यात येत आहे:—**

## परिशिष्ट (२)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील १९४९ चे कलम ४५ व ५३ (१) च्या तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या पदांसाठी कलम ४५ (३) व ४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता [पहा (नियम ३)]

| अ.क्र. | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| ८ | अग्निशामक (विमोचक) एस -६ (गट-क) (१९९००-६३२००) | नामनिर्देशन १०० टक्के | अग्निशामक -विमोचक,-गट-क या पदावरील नियुक्ती या पुढील मार्गाने करण्यात येतील,-आयोग/निवड समिती यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशाद्वारे.<br>**(i) वयोमर्यादा :**<br>(१) किमान वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण.<br>(२) कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी वयाच्या २८ वर्षापेक्षा कमी व मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींसाठी ३३ वर्षापेक्षा कमी.<br>**(ii) शैक्षणिक पात्रता :**<br>माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि अग्निशामक प्रशिक्षण "पाठ्यक्रम" उत्तीर्ण आणि हलके वाहन चालविण्याचा वैध परवाना ही अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती.<br>**(iii) शारिरीक अर्हता :**<br>(१) उंची : किमान १६५ सेंटीमीटर (पुरुष) व किमान १५७ सेंटीमीटर (महिला).<br>(२) वजन : किमान ५० किलोग्रॅम (पुरुष) व किमान ४६ किलोग्रॅम (महिला).<br>(३) छाती : किमान ८१ सें.मी (साधारण) व किमान ८६ सें.मी (फुगवल्यानंतर) (महिला उमेदवारांसाठी लागू नाही).<br>(४) दृष्टी : ६/६ (चष्मा शिवाय) |

"**अग्निशामक पाठ्यक्रम**" याचा अर्थ, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (एमएफएसए),मुंबई किंवा राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांच्याकडील अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण असा आहे किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांच्याकडून मान्यताप्राप्त खाजगी संस्थेकडून सहा महिन्याचा अग्निशमन पाठ्यक्रम उत्तीर्ण असलेला.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजिंक्य बगाडे,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.